The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024

# मराठी संत कवयित्री : व्यक्तित्व आणि कर्तृत्व

(संदर्भ - संत सोयराबाई, संत निर्मळा)

**प्रा.डॉ. गणेश शिवाजी मारेवाड**

ज्ञानोपासक महाविद्यालय, परभणी

**प्रस्तावना -** महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक जडणघडणीत संतांच्या कार्याचा आणि त्यांच्या लेखनाला महत्त्वाचा वाटा आहे. संत साहित्याला महाराष्ट्राच्या वैचारिक व आचारीक जीवन व्यवहारात महत्त्व आहे. कारण संतांनी प्रतिकूल परिस्थिती असतानाही जनसामान्यांच्या आचारविचाराला योग्य वळण देण्याचा प्रयत्न केला. जनसामान्यांना आचरण सुलभ धर्म सांगितला. त्यांनी समतेचा विचार मांडला. संत नामदेव, संत ज्ञानदेव, संत चोखामेळा, संत गोरा कुंभार, संत सावता माळी, संत कर्ममेळा, संत बंका महार या संत कवींबरोबर संत कवयित्रींनीही अभंगरचना केली आहे. त्यात संत सोयराबाई, संत निर्मळा, संत कान्होपात्रा, संत जनाबाई, संत भागु महारी यासारख्या अनेक संत कवयित्रींनी आपल्या अभंगरचनेतून समतेचा विचार मांडला. नवीन जीवनमूल्यांची मांडणी केली. या सर्व संत कवयित्री समकालीन आहेत. त्यांचा एकत्रित विचार मराठी साहित्यात झालेला नाही. त्यांचा एकत्रित विचार होणे गरजेचे आहे. तसेच संत कवयित्रींचे साहित्य ज्या पद्धतीने पुढे यायला पाहिजे त्या पद्धतीने ते आले नाही; पण ते पुढे आले पाहिजे. म्हणून या लेखात संत कवयित्रींच्या व्यक्तित्व व कर्तृत्वाचा विचार केला आहे.

विषयाची व्याप्ती, लेखाची शब्दमर्यादा याचा विचार करता या लेखात संत सोयराबाई व संत निर्मळा यांच्या व्यक्तित्व व कर्तृत्वाचा शोध घेतला आहे. संत कवयित्रींचे व्यक्तित्व व कर्तृत्वाचा विचार करताना त्या ज्या काळात जगल्या, वावरल्या त्या समाजाची स्थितीगती नीट समजून घेणे आवश्यक ठरते. तत्कालीन परिस्थितीच्या आकलनाशिवाय संत कवयित्रींचे व्यक्तित्व व कर्तृत्वाचे स्वरूप स्पष्ट होणार नाही. कारण आपल्या भोवतालच्या परिस्थितीचा मानवी जीवनावर, त्याच्या आचारविचारावर प्रभाव पडतच असतो. संत सोयराबाई, संत निर्मळा या संत कवयित्री तेराव्या शतकातील असल्यामुळे आपण तेराव्या शतकातील महाराष्ट्राची पार्श्वभूमी वस्तुस्थितीचा अगोदर शोध घेऊ.

**तेराव्या शतकातील महाराष्ट्र -**

तेराव्या शतकात महाराष्ट्रात रामदेवराय यादवांची सत्तेचा प्रभाव होता. हे यादव वैदिक धर्मव्यवस्थेचे समर्थक होते. त्यांचा प्रधान हेमाद्रीपंडित यांनी चतुरवर्गचिंतामणी हा ग्रंथ लिहिला.

यामध्ये जवळपास 2000 व्रत सांगितले आहेत. यावरून या काळातील व्रतवैकल्याचे स्वरूप लक्षात येते. या काळातील समाज वैदिक वर्णव्यवस्था, जातीव्यवस्थेचे पालन करत होता. त्यामुळे सर्वसामान्य माणसाचे जीवनात अज्ञान, अंधश्रद्धाचे प्राबल्य होते. उच्चवर्णीय लोक अस्पृश्यांचे, स्त्रियांचे मानसिक, शारीरिक व आर्थिक शोषण करीत होते. स्त्रियांना मंदिर प्रवेश नव्हता आणि या नियमांचे उल्लंघन केल्यास त्यांच्यावर सामाजिक बहिष्कार टाकणे, शारीरिक त्रास देणे, मारझोड करणे या शिक्षेला या उपेक्षितांना सामोरे जावे लागत होते.

महिलांना या काळात सामाजिक, राजकीय, धार्मिक, आर्थिक असा कोणताही समतेचा अधिकार नव्हता. या काळातील शूद्रांचे जीवन अतिशय बिकट होतेच; पण त्यापेक्षाही स्त्रियांच्या वाट्याला अतिशय हीन उपेक्षित जीवन आले. त्यांना खूप हलाखीचे जीवन जगावे लागत होते. स्त्रियांना माणूस म्हणून कोणताही अधिकार नव्हता. चूल व मूल एवढेच तिचे संकुचित क्षेत्र बनले होते. समाजजीवनात स्त्रियांचे स्थान दुय्यम दर्जाचे होते. स्त्रियांवर अनेक बंधने होती.म्हणून संत सोयराबाई संत निर्मळा त्यांनी सामाजिक समतेचा विचार मांडला. याचा प्रत्यय आपल्याला संत सोयराबाई, संत निर्मळा यांच्या अभंगांतून येतो. आता आपण संत सोयराबाई संत निर्मळा यांच्या व्यक्तित्व व शोध घेणार आहोत.

**संत सोयराबाई यांचे व्यक्तित्व -**

संत सोयराबाई यांचा जन्म-मृत्यूकाल या संदर्भात कोणताही लेखी पुरावा नाही. तिचा जन्म महार या अस्पृश्य जातीत झाला. ती संत चोखोबांची धर्मपत्नी. संत चोखोबांचा इ.स. १३३८ हा निधनकाळ उपलब्ध आहे. यावरून संत सोयराबाई तेराव्या शतकात होऊन गेली, असेच म्हणावे लागते. तिच्या चरित्राविषयी लेखी पुरावे मिळत नसल्यामुळे तिच्या अभंगांचा तसेच तिच्या समकालीन संतांच्या अभंगांचा आधार घ्यावा लागतो आणि त्यावरून ती अतिशय सात्विक वृत्तीची आणि संवेदनशील अशी स्त्री होती, हेच स्पष्ट होते. तिने संत चोखोबा सोबत संसार करताना त्यांच्या सुखदुःखात सोबत केली चोखोबा सोयराबाईचे नाते जसे पती-पत्नीचे होते तसेच गुरु शिष्याचेही होते. संत चोखोबास तिने गुरुस्थानी मानले होते.

संत चोखोबा यांच्यासोबत त्यांचा विवाह कधी झाला. याची माहिती मिळत नाही; पण संत चोखोबांशी विवाह होऊन बऱ्याच वर्षांनी विठ्ठलाच्या कृपाशीर्वादामुळे पुत्रप्राप्ती झाली. हा प्रसंग संत सोयराबाईचा भाऊ संत बंका यांनी आपल्या आठ अभंगांतून सांगितला आहे. विठ्ठलाच्या आशीर्वादाने पुत्रप्राप्ती झाल्याचा प्रसंग या अभंगांतून सांगितला आहे. देवाच्या आशीर्वादाने मूल होते. हा कोणाही विज्ञानवादी व्यक्तीला पटणारा विचार नाही. पण अनेक व्यक्ती अपत्य प्राप्तीनंतर ही देवाचीच कृपा आहे. देवाच्या आशीर्वादामुळेच आम्हाला पुत्रप्राप्ती झाली, असे म्हणतात आणि अशा अनेक कथा पुराण वाङ्मयातही आहेत. याचाच प्रभाव संत सोयराबाईच्या पुत्रप्राप्तीच्या कहाणीवर पडलेला दिसतो.

या प्रसंगावरून एक महत्त्वाची गोष्ट स्पष्ट होते, की संत सोयराबाईच्या प्रसुतीवेळी त्यांच्या कुटुंबाची आर्थिक स्थिती बिकट होती. घरी दारिद्र्य नांदत होते. घरात बाळातपणाची साधनसामुग्री नसल्यामुळे ती संत चोखोबांना म्हणते - माझ्या बाळांतपणासाठी घरी साधनसामुग्री काहीही नाही.

"चोखियाची कांता जालीसे गर्भिन | लागलासे पूर्ण नववा मास ||
स्वभावे विनंती करी पती लागी | घरी नाही सामग्री कैसे करू ||"[1]

सोयराबाईंना आपल्या बाळांतपणात साधनसामुग्री नसल्यामुळे ती कोण देईल याची काळजी लागली आहे, यावरून संत सोयराबाईच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थितीवर प्रकाश पडतो. संत चोखोबांना ही गोष्ट पटते म्हणून ते आपल्या बहिणीकडे संत निर्मळाकडे जातात. या काळात विठ्ठल संत निर्मळाचे रूप घेऊन येतात. संत सोयराबाईचे बाळंतपण करतात. हा प्रसंग वर्णन करताना संत बंका म्हणतात -

"चोखोबाची बहीण झाला शारंगधर | वहिनी उघडा दार हाका मारी ||"[2]
"कैसी बाई येथे आले पांडुरंग | धन्य तुझे भाग्य भेटी झाली ||"[3]

सगळ्याच उपेक्षित संतांच्या अभंगांत विठ्ठल वेगवेगळ्या रूपाने सहाय्य करतो, अशा कथा येतात. त्याचाच हा एक भाग आहे; पण यावरून संत सोयराबाईच्या आध्यात्मिक अधिकार मोठा होता. तिनेही विठ्ठल भक्ती केली. एकूणच वारकरी संप्रदायात संत सोयराबाईंना महत्त्वाचे स्थान असून तिने आपले संसारिक कर्तव्य पार पाडून विठ्ठल भक्तीचा ध्यास घेतला होता, हेच तिच्या व्यक्तिमत्त्वावरून स्पष्ट होते. आता आपण संत सोयराबाईच्या कर्तृत्वाचा शोध घेऊ.

**संत सोयराबाईचे कर्तृत्व -**

तेराव्या शतकातील संत कवयित्रींमध्ये संत सोयराबाईंचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. आज त्यांचे 62 अभंग उपलब्ध आहेत. संत सोयराबाईंचे अभंग संख्येने कमी असले तरी कसदार अनुभवामुळे ते समृद्ध झाले आहेत आणि महत्त्वाचे म्हणजे त्यामुळे मराठी साहित्य समृद्ध झाले आहे. संत सोयराबाईंनी आपले पती संत चोखोबांना आपल्या गुरुस्थानी मानले म्हणून तिने आपल्या अभंगांतून स्वतःचा उल्लेख चोख्याची महारी असा केला आहे. यावरून ती संत चोखोबाशी किती एकरूप झाली होती, हेच स्पष्ट होते. संत सोयराबाईचा जन्म महार या अस्पृश्य जातीत झाला. त्यातही स्त्री. त्यामुळे तिच्या वाट्याला दुःख, दैन्य, दारिद्र्यच आले, तिला उपेक्षित जीवन जगावे लागले. सतत हिनत्व तिच्या वाट्याला आले. हीच आपल्या मनातील सामाजिक वेदना विठ्ठलाला सांगताना संत सोयराबाई म्हणते -

"आमची तो दशा विपरीत झाली | कोण आम्हा घाली पोटामधी ||
आमचे पालन करील बा कोण | तुजविण जाण आता ||"[4]

या अभंगातून संत सोयराबाई म्हणते, आमची दशा खूप दयनीय झाली आहे. आमचा वाली कोणी नाही. ती या अभंगातून आपल्या वाट्याला आलेले दैन्य, दारिद्र्य, उपेक्षाच सांगत आहे. हे महार जातीतील स्त्रीचे वास्तव, सामाजिक जीवन तिने सांगितले आहे. म्हणून ती मराठी साहित्यातील पहिली महार संत कवयित्री ठरते.

तत्कालीन इतर स्त्री कवयित्रींपेक्षा सोयराबाईंचे वेगळेपण त्यांच्या विटाळविषयक अभंगरचनेत दिसून येते. सोयराबाईंचा जन्म अस्पृश्य व त्यातही स्त्री म्हणून झाला. त्यामुळे त्यांना अस्पृश्यतेच्या दु:खाची झळ बसली होती. त्यांनी देहाचा विटाळ मानणा-या कर्मठ
समाजाची कानउघडणी आपल्या अभंगातून केली आहे. अशी कानउघडणी करताना त्यांचा कोमल, हळूवार स्वर नकळत कडवा बनतो-

"देहासी विटाळ म्हणती सकळ । आत्मा तो निर्मळ शुद्ध बुद्ध ।।
देहाचा विटाळ देहीच जन्मला । सोवळा तो झाला कवण धर्म ।।
विटाळा वाचोनि उत्पत्तिचे स्थान । कोणी देह निर्माण नाही जगी ।।
म्हणुनी पांडुरंगा वानितसे थोरी । विटाळ देहांतरी वसतसे ।।
देहीचा विटाळ देहीच निर्धारी । म्हणत महारी चोखीयाची ।।"[5]

या अभंगातून त्यांनी शारीरिक विटाळ-शिवाशिवीच्या प्रथेवर कठोरपणे आघात करून वैश्विक सत्यच सांगितले आहे की, या जगात विटाळाशिवाय कोण आहे. आणि, हे सर्व त्या अत्यंत संयतपणाने आपल्या अभंगातून व्यक्त करतात, हे महत्त्वाचे. वंशपरंपरागत चालत आलेल्या जातीय विटाळाबद्दल एवढ्या प्रखर व प्रभावी शब्दांमध्ये आपले मत यापूर्वी कोणत्याही संतकवयित्रीने नोंदविलेले आढळत नाही. संत सोयराबाईच्या या भूमिकेविषयी रावसाहेब कसबे म्हणतात, "विटाळ ही सर्जनाची विराट प्रक्रिया आहे. तिच्याशिवाय कोणताही देह उत्पन्न होऊ शकत नाही. साऱ्या सृष्टीच्या उत्पत्तीचे केंद्रच विटाळ आहे. निसर्गात, प्राणिसृष्टीत समागमाशिवाय सर्जन नाही. त्याच्याशिवाय मैथुन नपुंसक आहे. त्याच्याशिवाय माणूस वांझोटा आहे, हे सोयरा मानवजातीला समजावून सांगत होती. विश्वोत्पत्तीचा एवढा व्यापक विचार कोणत्याही संताच्या कवितेत मला आढळला नाही. स्त्रियांचे माहात्म्य, त्यांचे स्वातंत्र्य आणि स्वाभिमान जपणारी, सांगणारी ही आद्य महारीण होती. या देशात ते शूद्रातिशूद्रांनीच पहिल्यांदा सांगितले, म्हणून ते मध्ययुगीन भक्ती चळवळीचे क्रांतिकारक सैनिक बनले."[6] कसबेंच्या या अभिप्रायावरून, संत सोयराबाई या मध्ययुगीन काळातील, संत चळवळीतील सर्वांत चिंतनशील व तत्वज्ञानी स्त्री होत्या, तसेच तत्कालीन स्त्रीचे स्वातंत्र्य, स्वाभिमान आपल्या रचनेतून प्रकट करणा-या आद्य महार स्त्री होत्या, यावर प्रकाश पडतो.

**संत निर्मळा यांचे व्यक्तितत्व -**

संत निर्मळा नावाप्रमाणेच निर्मळ स्वभावाची होती. तिचा जन्मकाळ व जन्मस्थळ याविषयी माहिती मिळत नाही. पण, निर्मळाचे वास्तव्य हे बुलडाणा जिल्ह्यातील मेहूणपूर येथे होते, अशी माहिती मला मेहुणपुरी गावकऱ्यांनी दिली. या गावातून वाहणाऱ्या नदीला निर्मळा नावाने ओळखले जाते. संत चोखोबा हे घरात कुटुंबप्रमुख होते. त्यांचा प्रभाव घरातील सर्व सदस्यांवर होता. तो संत निर्मळावरही होता. ती चोखोबांप्रमाणेच भक्तिप्रवण वृत्तीची होती. तिच्या तोंडी नित्य विठ्ठलाचे नाम असे. ती चोखोबांच्या सहवासामुळे विठ्ठलभक्तीत रमू लागली. तिच्याविषयी तिचे पती संत बंका म्हणतात-

"चोखा तैसी बहिण बहिण तैसा चोखा । सदा नाम मुखा विठोबाचे।।"[7]

संत चोखोबा विठ्ठलभक्त होते. संत चोखोबांचा सहवास निर्मळास लाभला होता. त्यामुळे संत चोखोबांचा सहवास लाभल्यावर त्यांच्यासारखे न झाल्यास नवलच. संत बंकाप्रमाणे सोयराबाईही एका अभंगात निर्मळाविषयी म्हणतात-

"चोखा निर्मळा एकरूप । दरूशनें हरे ताप ।।
वाचे विठ्ठल नाम छंद । नाहीं भेद उभयंता ।।"[8]

या संत बंका व सोयराबाईच्या अभंगांवरून चोखोबा व निर्मळा हे दोघे बहीणभाऊ किती एकरूप होते, याची साक्षच मिळते. संत चोखोबाशी निर्मळाचे नाते दोन प्रकारचे होते. सांसारिक दृष्टीने चोखोबा व निर्मळाचे नाते बहीणभावाचे होते. तसेच निर्मळाने आपल्या बंधूला म्हणजेच संत चोखोबास आपला गुरू व मार्गदर्शकही मानले होते.

"चोखा म्हणे निर्मळेसी । नाम गाये अहर्निशी ।।
तेणें संसार सुखाचा । इह परलोक साचा ।।
साधन हेंचि थोर असे । शांति क्षमा दया वसे ।।
ऐकतांचि आनंदली । निर्मळा मिठी चरणी घाली ।।"[9]

या अभंगावरून, संत चोखोबांनी निर्मळेस भक्तिसाधनेचा उपदेश केला म्हणून संत निर्मळाचे संत चोखोबांशी भावाप्रमाणे गुरूचे असे दोन प्रकारचे नाते होते, हे स्पष्ट होते. 'पद्मावती श्रोत्रीय यांनी 'संत चोखामेळा आणि परिवार: विवेचक अभ्यास' या आपल्या पुस्तकात चोखोबांची वंशावळ दिली आहे. त्यानुसार मीराबाई-निवृत्ती हे निर्मळाचे आईवडील होते, असे या वंशावळीत दाखविले आहे.'[10] तसेच, ज. र. अजगावकर म्हणतात, "राम-गजराबाई हे निर्मळाचे आजोबा व आजी, तर मीराबाई-निवृत्ती हे निर्मळाचे आई-वडील होते."[11] श्रोत्रीय व अजगावकर यांच्या या नोंदीवरून, निर्मळाचा जन्म मीराबाई व निवृत्ती यांच्या पोटी झाला, एवढेच आज मानता येईल. पण, त्यांचा जन्मशक व मृत्युशक याची निश्चित माहिती कोठेच उपलब्ध नाही; पण संत चोखोबांच्या निधनानंतर संत निर्मळा जिवंत

होती, याचे संदर्भ तिच्या अभंगातून मिळतात. चोखोबांच्या निधनानंतर या कुटुंबावर फार मोठे संकट कोसळल्यासारखे झाले. यावर संत निर्मळा विठ्ठलाला प्रश्न विचारते, 'चोखोबांच्या नंतर आमचा तुला कंटाळा आला का?' हा अभंग असा-

"आजिवरी तुम्ही तयासी पाळिलें । अपराध साहिले चोखियाचे ।।

तयाचिया पाठी आमुचा कंटाळा । आला कां दयाळा सांगा मज ।।"[12]

या अभंगावरून, संत निर्मळा चोखोबांच्या पश्चात जिवंत होती, हे स्पष्ट होते. म्हणजे, निर्मळाला दीर्घायुष्य लाभले होते, असा अंदाज लावता येतो. पण, संत निर्मळाने या जगाचा निरोप कधी घेतला, याविषयी निश्चित पुरावा उपलब्ध नाही. बुलडाणा जिल्ह्यातील मेहूणराजा येथे एक उत्तरवाहिनी निर्मळा नदी आहे. या नदीत एक शिवलिंग आहे. ते बंका व निर्मळाची समाधी म्हणून सांगितले जाते. या स्थळास प्रत्यक्ष प्रबंधसंशोधन कर्त्याने भेट दिली आहे. बंका व निर्मळाची मूळ समाधी नदीच्या गाळात गाडली गेल्यामुळे आता केवळ शिवलिंगच दिसते, असे तेथील काही गावक-यांनी सांगितले. या निर्मळा नदीत शिवलिंगापर्यंत जाण्यासाठी जिल्हा परिषद, बुलडाणा प्रशासनाने पाय-याही केल्या आहेत.

एकूणच, संत निर्मळाने आपला संसार सांभाळत आयुष्यभर विठ्ठलाचे नामस्मरण करून चोखोबांनी सांगितलेल्या भक्तिमार्गाने वाटचाल केली. चोखोबांच्या सहवासामुळे ती विठ्ठलभक्तीत रमू लागली, हे तिच्या जीवनचरित्रावरून स्पष्ट होते.

**संत निर्मळा यांचे कर्तृत्व -**

संत निर्मळाचे २४ अभंग आज उपलब्ध आहेत. तिचे अभंग संख्येने कमी असले तरी ते गुणात्मकतेने ओतप्रोत भरलेले आहेत. तिने अभंगांतून आपला 'बहिण चोखीयाची' असा उल्लेख केला आहे. यातून तिने आपल्या वडील बंधू व गुरूविषयी आदरच व्यक्त केला आहे.

संत चोखोबांच्या परिवारातील सर्वांच्या अभंगांतून एकमेकांविषयीचा भाव, आपआपसांतील प्रेम, वात्सल्य व आदर व्यक्त झालेला आहे, हा एक विशेष म्हणून सांगता येईल. चोखोबांच्या कुटुंबीयांचे लौकिक आणि पारलौकिक विचारांचे प्रतिध्वनी एकमेकांच्या अभंगांत उमटलेले आहेत. संत निर्मळाच्या अभंगांतूनही चोखोबांविषयी प्रेम, जिव्हाळा व आदर व्यक्त झाला आहे. तसेच, त्यांचे जीवनचरित्रही

आले आहे. संत चोखोबा तिचे बंधू होते, तसेच गुरूही होते. अशा दोन्ही नातेसंबंधांमुळे चोखोबांचे चरित्र तिच्या अभंगातून येणे स्वाभाविकच ठरते.

संत निर्मळा आपले बंधू चोखोबांचे जेव्हा चुकते तेव्हा प्रसंगी त्यांची कानउघडणीही करण्यास कचरत नाही. 'जेव्हा चोखोबा सोयराबाईला नऊ महिने पूर्ण झाल्यावर बाळंतपणाच्या वेळी घरात काहीच सामग्री नसल्यामुळे निर्मळाकडे मेहूणपुरीस निघून येतात"[13] तेव्हा निर्मळा चोखोबांची चूक दाखवून देते व त्यांना सावरतेही. याचे वर्णन तिच्या एका अभंगातून येते-

"वडील तूं बंधू असोनी अविचार । केला कां निर्धार सांग मज ।।
न पुसतां कां बा आलासि धांवत । वहिनी आकांत करतील कीं ।।
येरू म्हणे विठ्ठ पुरविल सामोग्री । भार तयावरी घातिलासे ।।
निर्मळा म्हणे ही बरी नोहे गोष्टी । विठोबासी कष्टी करणें काज ।।"[14]

संत चोखोबा आपली पत्नी सोयराबाईच्या बाळंतपणावेळी संसारतापाने चटकन उद्‌वित होऊन सोयराबाईला न सांगता आपली बहिण निर्मळाकडे निघून येतात, तेव्हा निर्मळा म्हणते- 'तू हे बरे केले नाहीस. तू वहिनीला विचारून का आला नाहीस? तुझा हा अविचार आहे.' संसारतापाने चटकन उदास होणारे संत चोखोबा आणि त्यांची चूक दाखवून देऊन त्यांना सावरणारी, वयाने चोखोबांपेक्षा लहान असली तरी वृत्तीने प्रगल्भ असणाऱ्या निर्मळाच्या व्यक्तिमत्त्वाची रूपेच वरील अभंगातून पाहावयास मिळतात.

संत निर्मळाच्या व्यक्तिमत्त्वाप्रमाणेच तिच्या भावविश्वाचे प्रतिबिंबही तिच्या अभंगात पडलेले दिसते. निर्मळाला आध्यात्मिक क्षेत्रात मान मिळाला. समानतेची वागणूक मिळाली; पण प्रत्यक्ष जीवनात एक अस्पृश्य आणि त्यातही स्त्री म्हणून अवहेलनाच वाट्याला आली. म्हणून आपल्या मनाची तगमग व्यक्त करताना ती म्हणते-

"कां हो पांडुरंगा मज मोकलिले । पराधीन केलें जिणें माझें ।।"[15]

सामाजिक उपेक्षेतून निर्माण झालेली वेदनाच तिने आपल्या अभंगातून शब्दबद्ध केली आहे. आणखी एका अभंगात ती म्हणते -

"चहुकडे देवा दाटला वणवा । कां न ये कनवा तुज लागी ।।
सांपडलें संधी संसाराचे अंगी । सोडवी लगबगी मायबापा ।।
बहु मज उबग आला असे देवा । धांवे तूं केशवा लवलाही ।।
तुजविण मज कोण गणगोत । तूंचि माझा हितकर्ता देवा ।।
निर्मळा म्हणोनी पायीं घाली मिठीं । परतें न लोटीं मायबापा ।।"[16]

या अभंगातून निर्मळाने आपला जन्म शूद्र जातीत झाल्यामुळेच आपल्या वाट्याला उपेक्षा, अवहेलना आली, हे दु:खच ती प्रातिनिधिक स्वरूपात मांडले आहे.

संत निर्मळाची अभंगरचना अतिशय प्रगल्भ विचारसरणीची आहे. शुद्ध भक्तिभाव व नामस्मरण ही भक्तिसाधनेची गुरुकिल्लीच आहे, असे आपल्या अभंगातून निर्मळाने सांगितले आहे. निर्मळाची अभंगरचना सरळ असून, ती आत्मनिवेदनामुळे उत्कट झाली आहे.

**सारांश -**

संत सोयराबाई, संत निर्मळा यांची अभंगरचना संख्येने कमी असली तरी कसदार अनुभवांनी ती समृद्ध झाली आहे आणि त्यामुळे मराठी साहित्य समृद्ध झाले आहे. त्यांनी विठ्ठलभक्तीबरोबर उच्च दर्जाची जीवनमूल्य, नीतीमूल्यांचे तत्वज्ञान सांगितले. संत सोयराबाईने तत्कालीन स्त्रीचे स्वातंत्र्य, स्वाभिमान आपल्या अभंग रचनेतून अभिव्यक्त केला. स्पृश्य-अस्पृश्य, श्रेष्ठ-कनिष्ठ मानणाऱ्या कर्मठ मंडळींना संत सोयराबाई मानवी उत्क्रांतीचे वास्तव आपल्या विटाळ विषयक अभंगातून सांगत आहे. या अभंगातून तिने वैज्ञानिक, वैचारिक विचार मांडले आहेत. संत सोयराबाईचा जन्म महार जातीत झालेला होता आणि तिच्या या अभंगारचनेच्या अभिव्यक्तीमुळे ती मराठी साहित्यातील आद्य महार संत कवयित्री ठरते. हे तिच्या अभंगवाणीचे वेगळेपण.

संत सोयराबाईच्या अभंग रचना महत्त्वाच्या आहेतच तसेच संत निर्मळाने अतिशय प्रगल्भ विचारसरणीची मांडणी आपल्या अभंग रचनेतून केली आहे. संत सोयराबाई व संत निर्मळा यांची अभंग रचना सरळ, सुलभ व नादपूर्ण आहे तसेच त्यांच्या आत्मनिवेदनामुळे ती उत्कट झाली आहे.

**निष्कर्ष -**

1) संत सोयराबाई महार जातीतील पहिली संत कवयित्री. तिने विटाळविषयी आपली भूमिका प्रखरपणे अभंगातून मांडली.

2) संत सोयराबाई, संत निर्मळा यांची अभंगरचना संख्येने कमी असली तरी कसदार अनुभवांनी समृद्ध झाली आहे आणि त्यामुळे मराठी साहित्य समृद्ध झाले.

3) संत सोयराबाई, संत निर्मळा यांच्या चरित्राविषयी लेखी माहिती नसल्यामुळे त्यांच्या अभंगांचा व समकालीन संतांच्या अभंगाचा आधार घ्यावा लागतो.

4) संत सोयराबाई व संत निर्मळा या संत कवयित्रींनी आपल्या अभंगांतून विठ्ठल भक्तीबरोबर आपल्या वाट्याला आलेले सामाजिक वास्तवाची अभिव्यक्ती केली.

5) संत चळवळीतील चिंतनशील व तत्त्वज्ञानी स्त्री म्हणजे संत सोयराबाई, संत निर्मळा होय. त्यांच्या अभंगरचनेमुळे तत्कालीन स्त्रीचे जीवन वास्तवाचे आकलन होते.

**संदर्भ -**


1) श्री संत चोखामेळा चरित्र व अभंग,शब्दालयप्रकाशन,श्रीरामपूर,पृ.215, अभंग 29
2) कित्ता पृ.186
3) कित्ता पृ. 187
4) कित्ता पृ. 201, अभंग 25
5) कित्ता पृ. 198, अभंग
6) देशीवाद समाज आणि साहित्य, रावसाहेब कसबे,लोकवाङ्मयगृह, मुंबई,पृ. 181
7) श्री संत चोखामेळा चरित्र व अभंग, शब्दालयप्रकाशन,श्रीरामपूर,पृ.218,अभंग 38
8) कित्ता पृ. 207
9) कित्ता पृ. 231-232
10) संत चोखामेळा आणि परिवार : विवेचक अभ्यास, डॉ.पद्मावती श्रोत्रीय, गोकुळ मासिक प्रकाशन, पुणे, पृ. 29
11) महाराष्ट्र संत कवयित्री, ज. र. अजगावकर, दामोदर सावळाराम आणि मंडळी प्रकाशन, मुंबई, पृ. ७४
12) श्री संत चोखामेळा चरित्र व अभंग, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, पृ. 232
13) कित्ता पृ. 21, अभंग 13
14) कित्ता पृ. 231 अभंग 14
15) कित्ता पृ. 230 अभंग 6
16) कित्ता पृ. 229 अभंग 4